## —न्यायनिर्णय—

(आज दिनांक १३/०४/२०२६ रोजी घोषीत)

१. आरोपी विरुध्द कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदया अंतर्गत दंडनिय अपराधाकरीता आरोप ठेवण्यात आले.

२. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या साहित्यावरून माझ्या समक्ष विचाराधिन मुद्दे आणि निष्कर्ष कारणमीमांसासह खालील प्रमाणे आहे :—

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक २१/०९/२०२४ रोजी मौजा सुकडी डाक, ता. तिरोडा, जि. गोंदिया येथे आरोपीच्या ताब्यातुन १० लीटर हातभट्टी दारू किंमत रूपये १००० विना परवाना अवैधरित्या मिळुन आले? | **नाही.** |
| २. | कुठला गुन्हा शाबीत झाला काय? | **नाही.** |
| ३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

३. आरोपीविरूध्द पुरावा न आल्याने त्याचे फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणे बयाण नोंदविण्यात आले नाही. तसेच सरकारीपक्षाने मौका व जप्ती पंचनामा सहीपुरता **नि.क्र. ०७** वर भिस्त ठेवलेली आहे.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ :**

४. अभियोगपक्षाने आपली बाजू सिध्द करण्याकरिता पंच शंकर

रामदास उके (सा.क्र.०१) यांची साक्ष नोंदविली. दुसरा पंच साक्षीदार विनोद मोतीराम उके यांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. पंच शंकर रामदास उके (सा.क्र.०१) यांनी आपल्या सरतपासणीमध्ये राज्य उत्पादन शुल्कच्या अधिका–यांनी त्यांना पंच म्हणुन बोलविले नव्हते असे सांगितले. त्याचप्रमाणे त्यांनी जप्ती पंचनामा वर त्यांची सही असल्याचे सांगीतले असून मजकुर माहित नसल्याचे सांगीतले. यावरून असे लक्षात येते की, सदर साक्षदाराला प्रस्तुत प्रकरणामधील मुद्देमालाच्या जप्तीबद्दल काहीही माहिती नाही. यावरून असे दिसते की, सदर साक्षदाराने अभियोगपक्षाच्या समर्थनार्थ साक्ष दिली नाही.

५. अशा प्रकरणात स्वतंत्र पंच साक्षदाराची साक्ष महत्वाची असते. परंतु या प्रकरणातील स्वतंत्र पंच शंकर रामदास उके (सा.क्र.०१) यांची साक्ष लक्षात घेता असे निदर्शनास येते की, अभियोगपक्षाने आरोपीच्या ताब्यातुन १० लीटर हातभट्टी दारू जप्त केली हे सिध्द केले नाही. परंतु प्रस्तुत प्रकरणात सदरहू जप्ती सिध्द झालेली नाही. त्यामुळे सीए अहवाल निरर्थक असुन त्यावरून आरोपी विरूध्दचा गुन्हा सिध्द होत नाही. जरी वादाकरिता आरोपीकडून काही जप्त झाले हे गृहित धरले तरी जप्त वस्तु ही दारू होती हे सिध्द होत नाही. म्हणुन अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत केला असे ग्राह्य धरता येणार नाही. म्हणुन मला असे वाटते की, अभियोग पक्ष आरोपीविरुध्द वरील कलमान्वये गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला. म्हणुन मी मुद्दा क्र. १ ते २ चे उत्तर नकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्रमांक ३ ला अनुसरून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपीची महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) व ७७(अ) च्या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्ती पंचनाम्याप्रमाणे शिल्लक दारू व मोहासडवा राज्य उत्पादन शुल्क, गोंदिया यांनी अपिलाचा कालावधीनंतर संपल्यानंतर विल्हेवाट लावावी.

३. या प्रकरणामध्ये आरोपीने दिलेली जमानत पुढील सहा महिण्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहिल व त्या जमानतीला भारतीय नागरी सुरक्षा संहिताचे कलम ४८१ अन्वये जमानत म्हणुन ग्राहय धरण्यात येईल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)

**दिनांक : १३/०४/२०२६**
**स्थळ : तिरोडा**

**(अमित सुरेश अग्रवाल)**
**न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी,**
**तिरोडा.**